# बोनसाय – एक जपानी कला

डॉ. सुषमा लोखंडे प्रा. राजाराम राठोड डॉ. प्रदीपकुमार उलेमाले
सहाय्यक प्राध्यापक (उद्यानविद्या विभाग)
छ. शा. म. शि. संस्था, कृषी महाविद्यालय, कांचनवाडी, औरंगाबाद

बोनसाय ही कुंडीत झाडे वाढवायची जपानी कला आहे. मोठे वाढणारे झाड एका विशिष्ट पद्धतीने कुंडीत वाढवायचे. ही लहान पण वयाने थोराड अशी झाडे घरात फार सुंदर दिसतात. बॉन याचा अर्थ उथळ पात्र वा भांडे. साई म्हणजे झाड लावणे. या पद्धतीत झाडांची वाढ रोखून झाडाला बुटक्या अवस्थेत ठेवणे. त्यात मुळ्यांची वाढ पात्रापुरती मर्यादित ठेवणे. मुळ्याप्रमाणेच झाडाच्या वरच्या भागाला छाटणी देऊन झाड बुटके ठेवतात. सर्वात लहान झाड २-३ इंच उंचीचे तर मध्यम बोनसायचे झाड ६ ते १२ इंच उंचीचे असते. सर्वात मोठा बोनसाय १२ ते १४ इंचांपर्यंत उंच असतो. बोनसायला दिवसातून तीन पाणी देणे जरुरीचे असते. उन्हाळ्यात तर पाचवेळा पाणी दयावे लागते. प्रत्येकदा पाणी देताना तीन वेळा दयावे. पहिले पाणी वरचा पृष्ठभाग ओला करायला, दुसरे पाणी मध्यम खोलीपर्यंत व तिसऱ्यांदा घालून पाणी निचरून जाण्याकारिता. बोनसायचा महत्त्वाचा गुणधर्म म्हणजे त्या झाडांना फार थोडी जागा लागते. एखादा प्रकाशमान कोपरा व अर्धवट प्रकाशाच्या ३ ते ७ फूट जागेत बोनसायची १०० ते २०० झाडे बसू शकतील.



### बोनसायसाठी झाडांची निवड:

बोनसाय हे कोणत्याही झाडापासून करता येत असले तरी, कोणतेही बहुवर्षीय फुलाचे व चांगले फळझाड निवडावे. जंगलात डोंगरकपारीत उगवलेले रानटी झाडे देखील बोनसायकरता वापरता येतील. ४ ते ५ वर्षांचे लहान झाड बोनसायकरता निवडावे. डाळिंब, पेरू अश्या फळझाडांचे बोनसाय करायचे असल्यास गुट्कलम पद्धतीने झाड तयार करावे.





### बोनसायकरता मातीची निवड:

बोनसायकरता वापरायची माती ही फार महत्वाची बाब आहे. मातीला सेंद्रिय पदार्थ व अन्नद्रव्यांचे प्रमाण पुरेसे असावे. तसेच माती, हवा व पाणी निचऱ्याकरिता छिद्रे असावी. जपानमध्ये माती चाळून वापरतात. मातीतले चिकन मातीचे कण ह्युमसमुळे एकत्र येतात. ह्युमस मातीतल्या सेंद्रिय द्रव्यातून तयार होतो. बोनसायकरता वापरण्यात येणाऱ्या मातीतून पाण्याचा चांगला निचरा झाला पाहिजे. पाण्याचा निचरा होणाऱ्या कुंडीच्या बुडाशी बारीक चाळनीसारखी जाळी बसवावी.

### बोनसायकरता कुंड्या:

बोनसायकरता सर्वसाधारणपणे भाजलेल्या कुंड्या वापरतात. कुंड्या नेहमी उथळ असाव्यातव व त्यांच्या बुडाशी पाण्याचा निचरा होण्याकरता तळाशी मध्यभागी भोक असावे. बोनसायचे झाड जगणे हे सर्व्यस्वी पाण्याचा योग्य निचरा होण्यावर निर्भर असते. मुळ्या जमीनीत असल्या तरी त्यांच्या वाढीकरिता अन्नद्रव्याबरोबर त्यांना प्राणवायूची आवश्यकता असते. हा प्राणवायू मातीतून पाण्याचा निचरा झाल्यावर मुळ्यांना मिळू शकतो.

### कुंडीत झाड लावणे:

बोनसायच्या पात्रात झाड लावण्यापूर्वी त्या झाडांची मुळे तपासून घ्यावी. जुन्या मुळ्या काढून टाकाव्या. त्या पात्रात बोनसायचे झाड लावण्यापूर्वी कोणत्या बाजूला ते झाड लावले असता चांगले दिसेल ते बघून झाड लावावे. जर लांबट पात्र वापरले असेल तर पात्राच्या एका बाजूला ते झाड लावावे. झाड लावल्याबरोबर त्याला पाणी दयावे. झाड लावल्यानंतर ते पात्र आठवडाभर सावलीत ठेवावे व झाडाला अधूनमधून पाण्याचा फवारा द्यावा. अधूनमधून ती कुंडी व पात्र उन्हात ठेवावे नंतर दिवसभर उन्हात ठेवावे.

### बोनसायला वळण देणे:

बोनसायला वळण देताना झाडांचे नेसर्गिक वळण कसे असते ते बघुन वळण दयावे. जर मोह्या झाडाचे वळण सरळ ताठ उंच वाढणारे असल्यास बोनसायला तसेच वळण दयावे. जर एखाद्या झाडाने नैसर्गिक मुळे जाड व चहुबाजूला पसरणाऱ्या असल्यास बोनसायच्या मुळ्या छाटून त्या मुळ्या जाड व चारी बाजूला पसरणाऱ्या ठेवाव्यात. झाडाच्या वेगवेगळ्या हाताळण्याच्या पद्धती सुद्धा झाडाला वळण देता येते. चांगले वळण यायला बोनसायला कमीत कमी १० वर्षांचा कालावधी लागतो.

### बोनसाय छाटणी तंत्र:

१ ते २ इंच उंचीची बोन्सायची झाडे तांब्याच्या तारेने वळण देण्याकरता तयार नसतात. त्याकरता १ ते २ वर्षांचे बोनसाय पात्राच्या पृष्ट्भागापासून ३/४ इंच अंतरावर छांटावे. त्यानंतर १ ते २ वर्षांनी बोनसाय पाण्याच्या पृष्ट्भागापासून १ इंचावर छाटावे. फुले येणारे बोनसाय असल्यास जूनच्या मध्यास खालचे दोन डोळे ठेऊन खोड व फांद्या खुडाव्या. हे डोळे नंतर फुटतील व त्या फांद्या नोव्हेबरमध्ये खुडून लहान कराव्या.



### बोनसायला तांब्याच्या तारेचा वापर:

जर बोनसायने खोड वेडेवाकडे वाढत असले तर खोडाच्या बुडापासून तांब्याची तार त्याभोवती वर गुंडाळत नेऊन खोड सरळ करावे. ही तार खोड ताठ व सरळ होईपर्यंत तशीच ठेवावी.

### खते देणे:

बोनसायला खते फार जपून द्यायला हवीत. ही झाडे इतकी लहान असतात की, जरा जास्त खत झाले तर बोनसाय मरण्याची भीती असते. मातीतल्या अन्नद्रव्यांचा वापर करून सुरवातीला त्यांना एक वर्ष तरी खताची जरुरी नसते. बोनसायला खते वाढीकरिता नसून त्यांचे आरोग्य ठीक रहावे म्हणून खत दयावे. जास्त खतामुळे झाड बुटके ठेवण्याला मदत होणार नाही.

अत्यंत कमी शक्तीची द्रवखते बोनसायला देणे चांगले. बोनसायला पाणी दिल्यानंतर ही द्रवखते द्यावीत. फुले व फळे येणाऱ्या बोनसायला स्पेशल प्रकारची खते द्यावी लागतात. फळांचे डोळे उघडल्यावर खते देणे थांबवावे. फळे धरणाऱ्या बोनसायला अत्यंत कमी शक्तीचे द्रवखत फुले आल्यानंतर दोन महिन्यांनी दयावे.

### रोगप्रतिबंधक फवारे:

बोनसायच्या झाडांना महिण्यातून ३ वेळा तरी रोग व कीटक प्रतिबंधक फवारे दिले पाहिजेत. फवारे पानाच्या खालच्या बाजूला दिले पाहिजेत.

### बोनसायची काळजी:

बोनसायला भरपूर पाणी नियमितपणे जोपर्यंत दिले जाते तोपर्यंत ते उन्हात ठेवल्यास उत्तम राहते. सावलीत वाढलेले बोनसाय नाजूक होते. त्यांच्या फुलांचा रंग देखील फिकट होतो. रात्रीची जास्त थंडी पडणाऱ्या भागात बोनसायला जास्त वारादेखील सहन होत नाही. बोनसायला नियमित पाणी देणे फार महत्त्वाचे असते. बोनसायची झाडे निसर्गात मोठ्या वाढणाऱ्या झाडाच्या वळणाने वाढली पाहिजेत. तांब्याच्या तारेच्या वापरापेक्षा कात्रीने छाटून त्यांना योग्य वळण देणे चांगले. योग्य वेळेला पात्र व कुंडी बदलायला कधीच हयगय करू नये. योग्य प्रकारची बोनसाय पूर्ण व्हायला ५ ते १० वर्षे लागतात.

(संपर्क: +९१ ८२७५५९९४८७)

★ ★ ★

### द्राक्षावरील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन

- ऑक्टोबर छाटणीनंतर खोड व वलांड्यावरील मोकळी झालेली साल काढावी.
- छाटणीनंतर लगेच वेलीच्या खोडांना आणि वलांड्यांना ब्लायटॉक्स ०.४ टक्के किंवा गेरू ३ किलो प्रति १० लिटर अथवा १० टक्के बोर्डो पेस्ट + मेथोमील ३ ग्रॅम + क्लोरापायरीफॉस नुवान ३ मि.ली + १.५ मि.ली स्टिकर प्रति लिटर पाणी या प्रमाणात पेस्टींग करावे.
- फुलकिडींच्या नियंत्रणासाठी थायोमेथॉक्झाम २५ डब्ल्यू.जी. ३ ग्रॅम किंवा स्पिनोसॅड ४५% एस.पी. ३. मि.ली किंवा फिप्रोनील ८० % डब्ल्यू.जी. १५ मि.ली या किटकनाशकाची १५ दिवसांच्या अंतराने २ फवारण्या कराव्यात.
- नवीन फुट आली असताना निंबोळी अर्क ५ टक्के दोन फवारण्या आणि मॅलिथिऑन ०.१० टक्केची फवारणी करावी.
- मण्यात पाणी उतरण्याच्या अवस्थेत मिलीबगचा प्रादुर्भाव वाढल्यास १५०० ऑस्ट्रेलियन बिटल (क्रिप्टोलिमस भुंगेरे) प्रति हेक्टरी २१ दिवसाच्या अंतराने २ वेळेस सोडावेत.
- फवारणीच्या पाण्याचा पी.एच. ६.५ ते ७ असावा.
- केवड्याच्या नियंत्रणासाठी मेटॅलॅक्झील –मॅन्कोझेब (०.२%) किंवा सायमोक्झॅनील- मॅन्कोझेब (०.२%) किंवा फिनॅमिडन- मॅन्कोझेब (०.२५%) किंवा अझोक्जीस्ट्रॉबीन (२०० मिली/एकर) किंवा फेमॉक्झॅडोन + सायमोक्झॅनील (२०० मिली/एकर) किंवा क्रिसॉक्झीम येथील (२५० मिली/एकर) किंवा पायरॅक्लॉस्ट्रोबीन + मेटीरॅम (१.७५ ग्रॅम/लीटर) या बुरशीनाशकांच्या ५ फवारण्या छाटणीनंतर १२ दिवसांचे अंतराने आलटून-पालटून कराव्यात.
- भूरी रोगाच्या नियंत्रणासाठी ८०% पाण्यात विरघळणारे गंधक २० ग्रॅम किंवा डिनोकॅप ५ मि.ली १० लिटर पाण्यात किंवा ट्रायडेमिफॉन २५० ग्रॅम किंवा पेनकोनॅझॉल ५ मि.ली १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.